महाराष्ट्र शासन

# सहाय्यक संचालक इतर मागास बहुजन कल्याण पुणे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, स.नं.१०४/१०५, विश्रांतवाडी रोड, पोलिस स्टे शन समोर, येरवडा पुणे
दुरध्वनी व फॅक्स क्र.०२० २९७०६६११ E-mail:-adobcpune@gmail.com

---

जा.क्र.ससं/इमाबक/भासशि/विजाभज-इमाव-विमाप्र/महाडीबीटी/मार्गदर्शन/२०२४-२५/१३२३ दि.२६/०७/२०२४

प्रति,
प्राचार्य,
अनुदानित / कायम विनाअनुदानित
व्यावसायिक महाविद्यालये (सर्व),
पुणे जिल्हा.

**विषय :** शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ करिता **"पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना"** अंतर्गत भटक्या जमाती-क प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी अर्ज सादर करणेबाबतची माहिती महाविद्यालयाच्या दर्शनी भागावर प्रसिध्द करणेबाबत..

**संदर्भ :** १. इतर मागास बहुजन कल्याण, मंत्रालय मुंबई, शासन निर्णय दि.०६.०९.२०१९
२. इतर मागास बहुजन कल्याण, मंत्रालय मुंबई, शासन निर्णय दि.२१.०६.२०२४

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, आदिवासी विकास विभागाच्या पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेच्या धर्तीवर, शासकीय वसतिगृह योजनेपासून वंचित असलेल्या भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजाच्या विदयार्थ्यांकरिता पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना राबविण्यास संदर्भ क्र.१ येथे नमुद दि.०६.०९.२०१९ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

तथापि याव्दारे आपणास सुचित करण्यात येते की आपल्या महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेत असलेल्या भटक्या जमाती-क प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सदर योजनेंतर्गत अर्ज करणेकरिता योजनेबाबतची माहिती दर्शनी भागावर प्रसिध्द करावी. भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजातील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या परंतु, शासकीय वसतीगृहामध्ये प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना **"पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना"** राबविण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. संदर्भ क्र. २ मधील शासन निर्णयान्वये योजनेअंतर्गत अर्ज करताना दिलेल्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत -

**अ) मुलभूत पात्रता :-**

१. विद्यार्थी हा भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजाचा असावा.
२. विदयार्थी वसतीगृह प्रवेशास पात्र असावा. (या करिता विद्यार्थ्यांनी प्रथम या विभागाअंतर्गत असलेल्या वसतिगृहास अर्ज करणे अनिवार्य आहे.)
३. विद्यार्थी हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.
४. सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला भटक्या जमाती-क प्रवर्गाचा जातीचा दाखला/ तसेच भटक्या जमाती-क प्रवर्गाचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिले वैध जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल.
५. अनाथ प्रवर्गामधून अर्ज करणा-या विद्यार्थ्यांना महिला व बालकल्याण विभागाकडील सक्षम प्राधिका-याचे अनाथ प्रमाणपत्र आनिवार्य आहे.
६. दिव्यांग प्रवर्गामधून अर्ज करणा-या विद्यार्थ्यांना जिल्हा शल्यचिकित्सक यांचे ४०% पेक्षा जास्त दिव्यांग असल्याबाबतचे

प्रमाणपत्र अनिवार्य आहे.

७. विद्यार्थ्याच्या पालकाचे उत्पन्न रु.२.५० लाख पेक्षा जास्त नसावे. तसेच केंद्र शासनामार्फत ज्या ज्या वेळी मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्तीसाठी उत्पन्न मर्यादेत वाढ होईल, त्यानुसार या योजनेसाठी पालकाची वार्षीक उत्पन्न मर्यादा लागू राहील.

८. विद्यार्थ्याने स्वतःचा आधार क्रमांक आपले राष्ट्रीयकृत बँक खात्याशी संल्लग्न करणे बंधनकारक राहील.

९. विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेली शैक्षणिक संस्था ज्या शहराच्या तालुक्याच्या ठिकाणी आहे अशा शहरातील सदर विद्यार्थी रहिवाशी नसावा.

**ब) शैक्षणिक निकष :-**

१. सदरचा विद्यार्थी १२ वी नंतरचे उच्च शिक्षण घेत असावा.

२. **व्यवसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांस** सदर योजनेसाठी अर्ज करताना किमान ६० टक्के किंवा त्या प्रमाणात ग्रेडेशन / CGPAचे गुण असणे आवश्यक राहील. जास्त प्रमाणात अर्ज प्राप्त झाल्यानंतर, इयत्ता १२ वी मध्ये प्राप्त गुणांची टक्केवारी विचारात घेतली जावी.

३.या योजनेंतर्गत निवड केलेला विद्यार्थी संबंधित अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यत लाभास पात्र राहील.

४. केंद्र शासनाच्या पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती करीता निश्चित करण्यात आलेल्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना सदर योजनेंतर्गत लाभ देण्यात येईल. तथापि, दोन वर्षापेक्षा कमी कालावधीच्या अभ्यासक्रमासाठी या योजनेचा लाभ मिळणार नाही.

५. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, अखिल भारतीय वैद्यकीय परिषद, भारतीय फार्मसी परिषद, वास्तुकला परिषद, राज्य शासन किंवा तत्सम संस्था इ. मार्फत मान्यताप्राप्त महाविद्यालयात/संस्थेमध्ये व मान्यता प्राप्त अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यास प्रवेश मिळालेला असावा.

६. योजनेंतर्गत, तालुकास्तरावर लाभ मंजूर करण्यासाठी भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजातील विद्यार्थ्याने इ. १२ वी नंतरच्या मान्यताप्राप्त व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयामध्ये केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेतलेला असावा.

७. एका शाखेची पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी या योजनेचा लाभ घेतल्यानंतर पुन्हा इतर शाखेच्या पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यास या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

८. निवड करण्यात आलेल्या विद्यार्थी संबंधित अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत लाभास पात्र राहील. मात्र विद्यार्थ्यास प्रत्येक वर्षी त्या त्या अभ्यासक्रमाच्या परिक्षेत उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

९. योजनेंतर्गत लाभ मिळण्याकरिता विद्यार्थ्याची महाविद्यालयीन उपस्थिती किमान ७५% असावी.

सदर योजनेंतर्गत शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ मधील अभ्यासक्रमाच्या प्रथम, व्दितीय, तृतीय व चतुर्थ वर्षातील विद्यार्थ्यांना अर्ज सादर करता येईल. तथापि सदर योजनेचा अर्ज करणे पुर्वी इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत सहाय्यक संचालक पुणे या कार्यालयाच्या अधिनस्त मागासवर्गीय मुला व मुलींचे शासकीय वसतिगृह यांची सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात प्रवेश प्रक्रिया सुरु केलेली असल्याने विद्यार्थ्यांनी प्रथम वसतिगृहास अर्ज करणे अनिवार्य आहे. सबब वसतिगृहापासून वंचित राहणा-या विद्यार्थ्यांनाच **"पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना"** अंतर्गत लाभ देण्यात येईल

**सोबत-** अर्जाचा नमुना व अर्जासोबत आवश्यक असलेल्या कागदपत्रांची यादी

(विशाल लोंढे)
**सहाय्यक संचालक**
**इतर मागास बहुजन कल्याण पुणे**

**प्रत - माहितीस्तव सविनय सादर:-**

१.मा.संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, म.रा पुणे

२. मा.प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण (प्रादेशिक) विभाग, पुणे.